**केरोसीन नियतन आदेश**
**माहे-मार्च २०१६**

क्रमांक/अका/नापुली/पुरवठा/कावी/९४८ /२०१६
जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ
दिनांक - १४/३/२०१६

आदेश

विषय :- माहे- मार्च-२०१६ करीता केरोसीन वाटपाचे नियतन ५०% व्दार वितरण प्रणाली अंतर्गत तालुक्यात केरोसीन वितरण करणेबाबत.

संदर्भ :- १)शासनाचे पत्र क्र. पत्र क्र.केइआर-२०१५/सीआर-४३३/सीएस-२७ दिनांक –०९/०३/२०१६

माहे-मार्च-२०१६ या महिन्याकरीता शासनाकडून उपरोक्त शासन पत्र दिनांक-०९/०३/२०१६नुसार प्रतिमाह १२२४ के.एल केरोसीन नियतन प्राप्त झालेले आहे. तेव्हा केरोसीनची उचल मुदतीत होण्याच्या दृष्टीने तसेच तालुक्यातील कार्ड धारकांना वेळेवर केरोसीनची उचल करुन कार्ड धारकांना वितरण करण्याच्या दृष्टीने माहे-मार्च २०१६ या महिन्याकरीता (दिनांक-१/०३/२०१६ ते ३१/३/२०१६ या कालावधी करीता ) प्रती माह १२०० के.एल. केरोसीन वाटपाचे अंतीम नियतन करण्यांत येत आहे. १२००के.एल. केरोसीन पैकी ६८४ के.एल केरोसीन व्दार वितरण प्रणाली अंतर्गत करण्यांत येत आहे.

तेव्हा माहे-मार्च २०१६ या कालावधीचे नियतनामध्ये बदल करण्यांत येत असुन मा. उच्च् न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांचे कडील रिट पिटीशन क्रमांक १०५६/१४ मधील आदेश पारीत दिनांक ११/४/२०१४ नुसार यापुढे केरोसीनचे वितरण करतांना सरळ किरकोळ केरोसीन परवानाधारक यांना कंपनी कडील एजंट यांचे मार्फत तालुकास्तरावर व्दार वितरण करण्यांत येत आहे.

शासन पत्र दिनांक-१२/८/२०१४ अन्वये निदेर्शित केल्याप्रमाणे घाऊक / अर्धघाऊक / केरोसीन एजंट यांनी प्रत्येक महिन्याचे १० तारखेपर्यत ६०% कोटा, १७ तारखेपर्यत ८५% कोटा व दर महिन्याचे २५ तारखे पावेतो १००%कोटा उचल करावयाचा आहे. तेव्हा अर्धघाऊक एजंटांनी त्यांना दिलेल्या घाऊक एजंटाकडून तात्काळ डि.डि पाठवुन मागणी नोंदवुन केरोसीन प्राप्त करुन घ्यावे. डी.डी.पाठवुन जर एखादया डिलरने केरोसीन दिले नाही. तर त्यांचे विरुध्द नियमानुसार कारवाई करण्यांत येईल. तसेच शिल्लक नियतन उचल करण्याकरीता मुदत वाढ देण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी. २५ तारखेनंतर कोणत्याही अर्धघाऊक /घाऊक एजंटाची केरोसीन संबधी तक्रार ऐकल्या जाणार नाही. ज्यांचेकडून करोसीन उचल मुदतीच्या आंत न झाल्यास त्यांचे विरुध्द नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.याची नोंद घ्यावी.

केरोसीन दर आकारणी या कार्यालयाचे आदेश क्रमांक /अका/ नापुली / पुरवठा /कावि/१०२४/२०१६ दिनांक-१८ मार्च २०१६ नुसार अंमलात आलेल्या आदेशानुसार करावी. ज्या केंद्राकरीता साठा दिला आहे तेथेच प्राप्त नियतनातुन प्रत्येक तालुंक्यात सोबत जोडण्यांत आलेल्या विवरण पत्रानुसार पुरवठा करावा. महिन्याचें अखेरच्या तारखेस तालुकानिहाय वाटपाची यादी या कार्यालयास सादर करावी. तालुकावार केलेल्या नियतनापेक्षा संबधित तालुक्यात कमी पुरवठा झाल्यास संबधित कंपनीचे प्रतिनिधी जबाबदार राहील व कारवाईस पात्र राहील.

वरील प्रमाणे माहे-मार्च २०१६ या कालावधीत नियतन आदेश करण्यांत येत असुन यासोबत जोडण्यांत आलेल्या केरोसीन नियतन विवरण पत्रात नमुद केल्यानुसार आपले तालुक्यात व्दार वितरणा अंतर्गत नियतन केलेले केरोसीन किरकोळ केरोसीन परवानाधारक यांना कंपनी कडील घाऊक परवानाधारक यांचे मार्फत सरळ व्दार वितरण प्रणाली अंतर्गत केरोसीनचे वितरण आपले स्तरावरुन करुन घ्यावे. **तसेच शासन निर्णय दिनांक-२०/८/२०१५ नुसार केरोसीनचे वाटप करावे. तसेच केरोसीनचा अपहार होणार नाही. याची दक्षता घेण्यांत यावी.**

करीता व्दार वितरणाकरीता निवड केलेल्या गावांची यादी व तेथील किरकोळ परवानाधारक यांचे कडील मंजुर कोटयाची नियतन यादी आपले स्तरावरुन तात्काळ तयार करण्यांत येवुन ती कंपनी कडील घाऊक परवानाधारक यांना एकाच मार्गावरील किरकोळ केरोसीन परवानाधारकाची यादी व आपले अधिनस्त एक शासकीय कर्मचारी व्दार वितरण टॅंकर वर वितरणाकरीता नेमणुक करुन केरोसीनचे व्दार वितरण करुन यादी व व्दारवितरण करीत असल्याचे प्रमाणपत्र घाऊक केरोसीन परवानाधारक यांचे कडुन प्राप्त करुन या कार्यालयाकडे सादर करावे.

**जिल्हा पुरवठा अधिकारी,**
**यवतमाळ**

**जिल्हाधिकारी ,यवतमाळ**